# काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**डॉ. रोहिणी रामचंद्र हाके** इतिहास विभाग, काकासाहेब चव्हाण कॉलेज, तळमावले। मोब. नं. 9657039249

---

भारतामध्ये अनेक जाती-धर्मांचे अस्तित्व असून. भारतिय समाज स्पृश्य आणि अस्पृश्य अशा दोन वर्गांमध्ये विभागलेला आहे. स्पृश्य म्हणजेच उच्च जाती. या लोकांना अस्पृश्य जातीतील लोकांच्या सावलीचाही विटाळ वाटे, त्यांची वाणी कानावर पडली तर अशुभ वाटे, सार्वजनिक पानवठयावर त्यांना पाणी भरण्यास प्रतिबंध असे, देवळात देवदर्शनास त्यांना बंदी असे. अत्यंत हिन दर्जाचे आयुष्य अस्पृश्य मानला गेलेला हा समाज जगत होता. अशा अस्पृश्य समाजाला माणूस म्हणून जगण्यासाठी आवश्यक असणारे हक्क मिळावेत म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आयुष्यभर प्रयत्न करीत राहिले. त्या प्रयत्नातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह व काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह होय.

## जातिसंस्थेविषयी आंबेडकरांचे विचार

'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट' या ग्रंथात डॉ. आंबेडकर म्हणतात की, "आज देखील जातीभेदाचे पुरस्कर्ते असावेत हा दुर्दैव विलास आहे.. जातिभेद श्रमविभाजनाचे दुसरे नाव आहे असे ते सांगतात. पण हे लक्षात घ्यायला पाहिजे की जातीव्यवस्था ही श्रम विभाजन नाही, ती श्रमिकांची विभागणी आहे. सुसंस्कृत समाजात श्रम विभाजनाची आवश्यकता आहे. परंतु कोणत्याही सुसंस्कृत समाजात भारतातल्याप्रमाणे श्रम विभाजनासोबतच श्रमिकांचे अनुल्लंघनीय असे कप्पे विभागलेले आढळणार नाहीत. जातिव्यवस्था निव्वळ श्रमविभाजन अथवा श्रमिकांचे विभाजन आहे असेही नाही. तर ती एक उतरंड आहे. दुसऱ्या कोणत्याही देशातील मजुरात श्रमासोबत श्रमिकांचे अशा प्रकारे विभाजन झालेले नाही. हे श्रमविभाजन आकस्मिक नाही. हे माणसांच्या नैसर्गिक प्रवृत्तीवर आधारलेले नाही. सामाजिक अथवा वैयक्तिक गुणवत्ता ठरवण्याकरता प्रत्येक व्यक्तीला आपल्या कर्तृत्वास वाव मिळाला पाहिजे व त्याला त्याच्या आवडीनुसार कार्यक्षेत्र निवडता आले पाहिजे. या तत्वालाच जातीव्यवस्थेत हरताळ फासला गेला.[1]

## तत्कालीन हिंदू मनोवृत्ती

तत्कालीन हिंदू समाजाची मनोवृत्ती दर्शवताणा डॉ. आंबेडकर म्हणतात की, "मुसलमानांनी तलवारीच्या जोरावर धर्म प्रसार केला म्हणून हिंदू त्यांना नावे ठेवतात. ख्रिश्चनांना देखील दंड सत्तेच्या बळावर धर्मप्रसार करण्याचा दोष देतात. परंतु खरे पाहता कोण श्रेष्ठ आहेत? स्वतःला मुक्तीचा मार्ग माहित नसलेल्या लोकांना आपल्या दृष्टीने मुक्तीचा समजला गेलेला मार्ग त्यांच्या इच्छेविरुद्ध देणारे मुसलमान व ख्रिश्चन श्रेष्ठ की, जे ज्ञानाचा प्रकाश पसरू इच्छित नाहीत, जे इतरांना नेहमी अज्ञानअंधकारात ठेवण्याचा प्रयत्न करतात, असे हिंदू लोक श्रेष्ठ आहेत? मला असे म्हणण्यास मुळीच संकोच वाटत नाही की मुसलमान हे क्रूर आहेत पण हिंदू हे नीच मनोवृत्तीचे आहेत आणि कृतीपेक्षा नीच मनोवृत्ती केव्हाही तिरस्करणीय"![2]

## मंदिर सत्याग्रह उद्देश

मंदिर प्रवेशाची चळवळ बाबासाहेबांना ईश्वर वा मोक्ष यासाठी आवश्यक वाटत नाही. ते म्हणतात,"अस्पृश्यांना देवळात जावयाचे आहे ते केवळ त्यांना बरोबरीने आपला हक्क बजावयाचा आहे म्हणून"[3]

मंदिर सत्याग्रहाचा उद्देश संगत असताना आपल्या अस्पृश बांधवांना उद्देशून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, "मंदिर प्रवेशाने तुमचे सर्वच प्रश्न सुटतील असे मुळीच म्हणता येणार नाही. आपल्या प्रश्नाचे स्वरूप व्यापक आहे. ते राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक अशा स्वरूपाचे आहे. पण आजचा हा आपला काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह हा उच्चवर्णीय हिंदू मनात एक प्रकारचे आवाहन आहे. शेकडो वर्ष उच्चवर्णीय हिंदूंनी आपल्याला माणुसकीच्या हक्कापासून दूर ठेवले, तेच हिंदू आपल्याला माणुसकीचे अधिकार देण्यास तयार आहेत का नाही. हिंदू मन खऱ्याखुऱ्या माणसाला माणूस म्हणावयास तयार आहे का नाही? हाच प्रश्न या सत्याग्रहातून समजणार आहे. उच्चवर्णीय हिंदूंनी आपल्याला कुत्र्या मांजरापेक्षाही हीन लेखले. पण आता तेच हिंदू आपल्यासारख्या माणसांना माणूस म्हणून किंमत देणार आहेत का नाही? या प्रश्नाचे उत्तर या सत्याग्रहापासून आपल्याला मिळणार आहे. हा सत्याग्रह हिंदूंच्या हृदय -मंदिरात बदल करण्यासाठी आहे. तो यशस्वी होणे वा न होणे हे हिंदू मनोरचनेवर अवलंबून आहे.

आम्हाला माहित आहे, मंदिरात दगडाचा देव आहे. त्याचे दर्शन झाल्याने व त्याची पूजा केल्याने आमचा प्रश्न सर्वस्वी सुटणार नाही. पण केवळ आजचा आमचा सत्याग्रह हा हिंदूंच्या मनात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे. विशिष्ट तात्विक भूमिकेने आम्ही आज सत्याग्रहाचे पाऊल टाकणार आहे.[4]

या पुढे जाऊन उच्चवरणीय हिंदूंना ते आवाहन करतात की, “मंदिराचे दरवाजे उघडून तुम्ही सगळे सदग्रहस्थ बनू शकता आणि अशा प्रकारचे माणूस बनण्याऐवजी तुम्हाला केवळ हिंदू बनून राहणे अधिक पसंत असेल तर तुम्ही मंदिराचे दरवाजे बंद ठेवा. मला तुमच्या मंदिरात जाण्याची काहीही गरज नाही.”[5]

**नाशिक येथील काळाराम मंदिर सत्याग्रहाचे ठिकाण का?**

नाशिक येथील काळाराम मंदिर सत्याग्रहाचे ठिकाण का निवडले याचे सोपे उत्तर आहे. एक तर राम हे हिंदूंचे पूज्य दैवत आहे. रामनामाच्या जपामुळे हिंदू माणसाला मोक्ष मिळतो. राम म्हणजे हिंदूंचे हृदय. या दृष्टीने रामाच्याच मंदिरात प्रवेश-सत्याग्रह करावा, म्हणजे बाकीच्या मंदिरांचा प्रश्न लवकरच सुटेल आणि त्याचबरोबर हिंदू मनात यथायोग्य बदल ही होईल ही रामाच्या मंदिरात सत्याग्रह करण्यामागची भावना असावी.

नाशिक क्षेत्राचे हे महात्म्य पाहता तेथे हिंदूंच्या हृदयातच प्रवेश मिळाल्यावर त्यांची अंत:करणे निर्मळ होतील, माणसाला माणूस म्हणून ते जगविण्याचा व वागवण्याचा धडा स्वतः घेतील. दक्षिण भारताच्या काशीत-नाशिक क्षेत्रात हिंदूंचे पूज्य दैवत रामाच्या मंदिरात मध्ये सत्याग्रह 1930साली मार्च महिन्यात सुरू करण्याचा इतिहास प्रसिद्ध निर्णय घेतला गेला.[6]

**काळाराम मंदिर सत्याग्रहास सुरवात**

मंदिर प्रवेश सत्याग्रहाचा निर्णय झाला व नाशिक जिल्ह्यात तो खेडोपाडी दलितांत पसरला. नाशिकमध्ये दलित सत्याग्रहींची गर्दी उसळून गेली होती. जनसमुदायाला प्रचंड रूप आले.[7] डॉ. बाबासाहेव सभास्थानी हजर होताच प्रचंड टाळयांचा कडकडाट झाला. सभेला सुरुवात झाली. सुरुवातीची इतर वक्त्यांची औपचारिक भाषणे झाली, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सत्याग्रहाचा हेतू काय आहे, हे सांगण्यासाठी उभे राहिले तेव्हा पुनः टाळयांचा कडकडाट झाला. आणि जयघोष सगळ्या वातावरणात घुमला. ते म्हणाले, “आम्हांला माहीत आहे. मंदिरात दगडाचा देव आहे. त्याचे दर्शन झाल्याने व त्याची पूजा केल्याने आमचा सर्वस्वी प्रश्न सुटणार नाही. या मंदिरात आजपर्यंत कोट्यवधी माणसांनी येऊन देवाचे दर्शन घेतले असेल पण त्या दर्शनाने त्या लोकांचा मूलभूत प्रश्न सुटला आहे असे कोण म्हणेल? हे आम्ही जाणतो. पण केवळ आजचा आमचा सत्याग्रह हा हिंदूंच्या मनात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे. विशिष्ट तात्त्विक भूमिकेने आम्ही आज सत्याग्रहीचे पाऊल टाकणार आहोत...”

**मानवतेच्या वाटेने प्रचंड मोर्चा**

काळाराम मंदिराच्या वाटेने सत्याग्रहींचा विराट मोर्चा होता. मार्च-फाल्गुन महिन्याचे ऊन, उन्हाच्या उष्ण धारा कोसळत होत्या. पण सत्याग्रहींना त्या शीतल वाटत होत्या. अस्पृश्यतेचे रणरणते ऊन ज्यांनी उभे आयुष्य सहन केले, त्यांना आजच्या उन्हाने काय होणार? उलट आज आपण राम मंदिरात प्रवेश करणार! आज आपल्याला माणुसकीचे दर्शन होणार ! आज आपल्याला माणुसकीचे हक्क मिळणार! याच हर्षाने सर्व सत्याग्रही सुखावले होते. सर्वांचे चेहरे समाधानाने फुलले होते.

सत्याग्रही मोर्चाच्या प्रथम आघाडीला डॉ. बाबासाहेब होते. सर्व सत्याग्रहीबरोबर तेही उन्हात चालले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोवत सत्याग्रही मोर्चाच्या आघाडीला देवराव नाईक होते, ही. व्ही. प्रधान होते. भास्करराव कद्रेकर होते. तसेच श्री. सहस्रबुद्धे व शिवतरकर होते. त्या वेळचे नाशिक जिल्ह्याचे दलितांचे सर्व नेते आघाडीला होते. असे सर्व कर्ते जाणकार पुढारी आघाडीला होते. डॉ. बाबासाहेब यांच्यामागे ते चालले होते.[8] मोर्चा आता कलरम मंदिराकडे चालला होता.

**सनातनी मंडळींचा विरोध**

मेन रोडवरून रामाच्या मंदिराकडे चाललेला प्रचंड मोर्चा पाहून नाशिक शहरातील सनातनी हिंदू-मने बिथरली, सनातनी मंडळीना वाटले "आता ही सत्याग्रही मंडळी रामाच्या मंदिरात शिरणार! रामाला वाटविणार! राम देवळातून निघून जाणार! आता आमचे पुढे काय?" असे एक का अनेक प्रश्न, शंका-कुशंका त्यांच्यापुढे उभ्या राहिल्या.. त्यांच्या डोक्यांत काळयाकुट्ट विचारांचे थैमान सुरु झाले...

पण सत्याग्रहींचा तो मोर्चा धीराने कारंजे चौक मागे टाकून गोदावरीवरील पूल ओलांडून पुढे चालला होता. तो पंचवटीवरून रामाच्या मंदिराकडे वळला.

पण रामाच्या मंदिराचे दरवाजे बंद केले गेले. पुजाऱ्यानी, मंदिराच्या भक्तांनी दरवाज्याला कुलपे घातली. रामाला प्रत्यक्षपणे कोंडून टाकले. ... तरीही सत्याग्रही मोर्चा रामाच्या मंदिराच्या पूर्व दरवाज्यावर 'माणुसकीच्या मागणीसाठी 'धरणे धरून बसला.[9]

**मानवतेचे दरवाजे बंद**

पंधरा हजार दलित बंधु-भगिनी सत्याग्रहींचा प्रचंड मोर्चा राममंदिराच्या पूर्व बाजूच्या दरवाज्यासमोर थांबला. डॉ. बाबासाहेब व इतर कार्यकर्ते आघाडीवर होते.

रामाच्या मंदिराचे चारी दरवाजे बंद होते. नुसतेच ते बंद नव्हते, तर दरवाज्याला कुलुपे घातली होती आणि त्यात शेकडो पोलिसांचा बंदुकीसह कडक पहारा होता.

त्या रामाच्या मंदिरापुढील आवारात मोर्चा येऊन थांबला. दरवाज्यावर मोर्चा आल्यावर मोर्चाचे समोर कलेक्टर गार्डन गेले व डॉ. बाबासाहेब यांच्याशी बोलले. त्यावेळी डॉ. बाबासाहेबांनी त्यांना सांगितले की, "आमचा हा सत्याग्रह मानवी हक्क प्रस्थापन करण्यासाठी आहे. हा सत्याग्रह आम्ही अतिशय शांततेने करू. आमच्या शांततामय मार्गापासून आम्ही तसूभरही ढळणार नाही, मात्र रामाच्या मंदिराचे दरवाजे बंद आहेत, तोपर्यंत आम्ही या मंदिराच्या चारीही दरवाज्यांवर रात्रंदिवस धरणे धरून बसू. दरवाज्यावर सत्याग्रहींच्या पंचवीस पंचवीस जणांच्या तुकड्या थांबल्या. बाकी सर्व पंधरा हजार सत्याग्रहींचा मोर्चा रामकुंडावर गोदावरी आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आघाडीवर होते.

सनातन्यांचे हात सत्याग्रहींवर पडण्यासाठी वळवळत होते. सत्याग्रहीवर हात टाकण्यासाठी त्यांची डोकी फोडण्यासाठी सनातनी गुंडांच्या हातांतील काठ्या- कुऱ्हाडी वळवळत होत्या. त्याचा प्रतिकार शांततेने, संयमाने व अहिंसेने मार्गाने करण्याची सत्याग्रहींची तयारी होती...

त्यातच नको ते झाले, व अघटित घटना घडली.... थोरल्या महारवाड्यातील सत्याग्रह कँपमध्ये सनातन्याचा भयंकर हल्ला आला. पुरुषगड्यांना धोपटले. स्त्रियांना मारपीट केली. काठ्या- कुऱ्हाडींचा तो हल्ला. मग काय ! सत्याग्रही माणसांच्या डोक्यावर जखमा झाल्या. ते रक्ताने न्हाले. एकच आकांत झाला. गोंधळ झाला. तरीही सत्याग्रही आपल्या ध्येयापासून तसूभरदेखील ढळले नाहीत. उलट, यशाचे ध्येय शिखर गाठण्यासाठी मोठ्या श्रद्धेने, निष्ठेने व आत्मविश्वासाने डॉ. बाबासाहेबांच्या विचाराने ते पुढच्या वाटेला लागले. त्यामुळे तर सनातनी प्रतिगामी विचाराच्या मंडळींची माथी अधिकच बिघडली. त्यांच्या विचाराचा तोल सुटला आणि त्यांच्या हल्ल्याचा मोर्चा नाशिक जिल्ह्याच्या खेडोपाडी वळला. त्या हल्ल्यात शिरस, पिंपळगाव, चेहली, चिंचोली, बाघाड, संसरी, धोंडवा, मोहाडी, टकावे, देवळनगर, दारणा, सांगवी, पाथर्डी व नाशिक रोड प्रेसमधील महार कामगारांवर अत्याचार, मारपीट व छळ चालू झाला. सत्याग्रहात भाग घेतलेल्या गावो-गावच्या महारवाड्याचे तेलमीठ, पाणी बंद केले व त्यांच्यावर संपूर्ण सामाजिक बहिष्कार टाकला.[10]

**रामनवमीचा रथ**

चैत्र शु।। पंचमी, षष्ठी, सप्तमी, अष्टमी अशा लागोपाठ दिवशी सत्याग्रह चालू होता. रामनवमी आली. नाशिकला हजारो यात्रेकरू आले. भाविक आले. भक्त आले. पण पाहतात तो रामाचे मंदिर बंद ! देवाचे दर्शन बंद. चारी दरवाज्यांवर सत्याग्रह चालूच होता. शेवटी सत्याग्रहींचे नेते डॉ. बाबासाहेब यांच्या विचाराने व गावच्या मंडळींच्या सल्ल्याने एक करार झाला. देवाचा रथ दोघांनी मिळून ओढण्याचा ठराव झाला.

कराराप्रमाणे गावपक्ष व सत्याग्रहीपक्ष यांनी रथ ओढण्याचा, पण सनातनी मंडळींनी पोटातील योजनेप्रमाणे सत्याग्रहींना सोडून, रथ ओढून पूर्व दारात पटांगणात आणला आणि सत्याग्रहींनी त्यांचा कावा ओळखला. त्यांची काळी अंतःकरणे, त्यांच्या हातांतील काठ्या लाठ्या, दगड-धोंड्यांत दिसू लागली. आणि सनातनी गुंडांचा रोख डॉ. बाबासाहेबांच्यावर वळला. बाबासाहेबांच्यावर दगडांचा पाऊस पडू लागला. भास्करराव कद्रेकर यांनी डॉ. बाबासाहेबांच्यावर छत्री धरली होती. छत्रीवर बाबांच्या अंगावर बदाबदा दगड पडत होते. भास्करराव कद्रेकर यांचे दगडाच्या माराने डोके फुटले होते. ते रक्ताने न्हाले होते, तरीही त्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या शिरावरील छत्री तसूभरही बाजूला घेतली नाही... घरांतून दगड पडत होते. माड्यांवरून दगड येत होते. समोरून दगड येत होते. चोहोंकडून दगड येत होते. सत्याग्रही रथ ओढीत होते. आणि पोलिसांचा कडक बंदोबस्त वाढला. पडलेल्या रथाचा पोलिसांनी कबजा घेतला. आणि कर्फ्यू ऑर्डर जारी केली. त्यामुळे सत्याग्रहात अडथळा आला, म्हणून स्वतः बाबासाहेबांनी गव्हर्नर सर फ्रेड्रीस साइक्स यांना भेटून नाशिक सत्याग्रहाचे सत्य कथन केले व पुढे दहा दिवसांनी 'कर्फ्यू ऑर्डर' रद्द केली.

हा ३ मार्च १९३० पासून सुरू झालेला सत्याग्रह १९३४-३५ सालापर्यंत चालू होता. देवळाभोवती सत्याग्रही तुकड्या-तुकड्यांनी गस्त घालीत होते. माणुसकीच्या दर्शनासाठी भुकेलेले सत्याग्रही दरवाज्यांवर धरणे धरून बसत होते. दलितांना माणुसकीचे दर्शन पाहिजे होते. पण सवर्ण हिंदू त्यांना माणुसकीचे दर्शन द्यावयास तयार नव्हते. दलितांना माणूस म्हणून मान्यता द्यावयास स्पृश्य हिंदू तयार नव्हते. दलितांना समानता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय देण्यास सवर्ण हिंदूंचे मन

तयार नव्हते. पण त्याचबरोबर दलित-वर्गही हिंदूंचे गुलाम म्हणून राबावायास तयार नव्हते. याच मंदिरप्रवेश सत्याग्रहातून धर्मान्तराची विचारस्फूर्ती निर्माण झाली; आणि त्या दिशेने डॉ. बाबासाहेबांच्या विचाराला गती मिळाली.[11]

**अस्पृश बांधवाप्रती डॉ. आंबेडकरांचे गौरवोद्गार**

काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाबाबत अस्पृश्य बांधवांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाधानी होते. आपल्या आत्मचरित्रामध्ये या सत्याग्रहाबाबत बोलताना ते म्हणतात, “नाशिक जिल्ह्यातील माझ्या अस्पृश्य बांधवांबद्दल मला मोठा अभिमान वाटतो. अस्पृश्यांनी, सर्वतोपरी असलेली बिकट विपरीत परिस्थिती लक्षात घेता, त्यांनी गेल्या तीन चार वर्षाचे स्वावलंबन व जे संघटन प्रत्यक्ष व्यवहारात प्रकट करून दाखवले व त्या जोशील्या धैर्यवृत्तीचा माझ्या या बंधू-भगिनींनी परिचय करून दिला ती सारी घटना खरोखर अपूर्व अशी आहे. दुसऱ्या कोणाचे सहाय्य नाही. कोणाचीही सहानुभूती नाही, उलट कोणत्या ना कोणत्या तरी निमित्ताने सर्वजण ना खुश व विरोधी बनलेले. अशा परिस्थितीत अस्पृश्यांनी, अस्पृशाकरता नाशिक सत्याग्रहासारखी चळवळ सतत तीन-चार वर्ष एवढ्या मोठ्या प्रमाणात, एवढ्या उत्साहाने व इतक्या संघटितपणे चालवावी, ही एकट्या हिंदुस्थानातीलच नव्हे तर, जगातील सर्व पददलित जनतेने अभिमान बाळगण्याजोगी घटना आहे, असे म्हणल्यास अतिशयोक्ति मुळीच नाही.”[12] सत्याग्रह आणखी तीन वर्षे चालला, पण मंदिराचे दरवाजे दलितांसाठी बंदच राहिले. जानेवारी 1933 मध्ये, डॉ सुब्बोरायनचे ‘मंदिर प्रवेश विधेयक’ इम्पीरियल कौन्सिलने नाकारले. मुंबई उच्च न्यायालयाचे निर्णयही सत्याग्रहाला प्रतिकूल होते. जेव्हा एप्रिल 1933 मध्ये सत्याग्रह पुन्हा सुरू करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला तेव्हा डॉ. बी.आर. आंबेडकरांनी या आंदोलनाला संमती दिली नाही. भाऊराव गायकवाड यांना लिहिलेल्या पत्रात, डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या सहकारी लोकांसाठी मंदिर प्रवेशाच्या कारणाचा पाठपुरावा न करण्याचा निर्णय व्यक्त केला, कारण त्यांचा असा विश्वास होता की त्यांनी मूर्तीपूजेमध्ये गुंतण्यापेक्षा शिक्षण आणि राजकारणावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

**निष्कर्ष**

माणुसकीचे हक्क मिळवण्यासाठी दलित वर्गातील स्त्री- पुरुषांच्या सहकार्याने डॉ.आंबेडकरांना नाशिक काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह करून खऱ्या मानव्याची प्रतिष्ठापना करावयाची होती. म्हणूनच मानवतेच्या इतिहासात नाशिक काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे.

काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह जरी यशस्वी झाला नसला तरी, डॉ. आंबेडकरांची सखोल उद्दिष्टे साध्य झाली कारण प्रत्येक स्तरातील अत्याचारित जातीच्या सदस्यांनी सत्याग्रहात सहभाग घेतला आणि योगदान दिले. न्याय्य कारणासाठी लोकसहभागाचे हे एक ज्वलंत उदाहरण आहे असे म्हणता येईल.

**संदर्भसूची**

1. डॉ. आंबेडकर बाबासाहेब, ॲनिहिलेशन, ऑफ कास्ट'चा मराठी अनुवाद-जातीसंस्थेचे उच्चाटन, वसंत मून(अनु), मनोविकास प्रकाशन, 1986, पृ. क्र. 42
2. कित्ता, पृ. क्र. 57
3. डॉ. यशवंत मनोहर, निबंधकार डॉ. आंबेडकर, संघमित्रा बुक हाऊस, 1988, पृ. क्र. 41
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माझी आत्मकथा, निर्मिती संवाद, कोल्हापूर, पृ.क्र. 20-21
5. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे भाषणे खंड दोन, प्रा. मा. फ. गांजरे, अशोक प्रकाशन, नागपूर,1985 पृष्ठ क्रमांक 130
6. शंकरराव खरात (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पत्रे, इंद्रायणी साहित्य, पुणे, 1990 पृ. क्र. 43
7. शंकरराव खरात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहवासात, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, 1998 पृ. क्र. 47
8. कित्ता पृ. क्र. 50- 51
9. कित्ता पृ. क्र. 55
10. कित्ता पृ. क्र. 58- 59
11. कित्ता पृ. क्र.59
12. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, उपरोक्त, पृ.क्र 22